


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार २ ऑक्टोबर २०२४ | अंक २९७० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# लक्ष्मण हाकेंवर दारु पिल्याचा आरोप, मनोज जरांगे पाटील यांची पहिली प्रतिक्रिया काय?

ओबीसी आंदोलनाचे नेते लक्ष्मण हाके यांच्यावर पुण्यात दारु पिऊन गोंधळ घातल्याचा आरोप आहे. ही घटना कालची असून त्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. आज या संदर्भात पत्रकार परिषदेत मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांना विचारण्यात आलं. लक्ष्मण हाके यांना क्लीन चीट देण्यात आली. रिपोर्ट ओके करण्यात आले असा प्रश्न विचारला. त्यावर मनोज जरांगे पाटील यांनी माझ काही म्हणणं नाही असं उत्तर दिलं. "मी सरळ आहे. तुम्ही मला एक दिवस बघत नाहीयत. मागच्या एक-दीड वर्षापासून बघताय. मी ज्याला विरोधक मानतो त्याचा तुकडाच पाडतो. ज्याला मानत नाही, त्याच्यावर बोलत नाही" असं सांगितलं.

"मानत नाही त्याला बोलत नाही, याचा अर्थ घाबरला, भितो असा कोणी काढू नये. लक्ष्मण हाके यांना क्लीनचीट दिली, याच्याशी काही देणं-घेणं नाही. कोणाच्या व्यक्तीगत आयुष्यात पडत नाही, तसे संस्कार मराठ्यांवर नाहीत. एखादा अडचणीत सापडला असेल, तर त्याला आणखी अडचणीत आणण्याचे संस्कार आमच्यावर झालेले नाहीत. संधी आली की, चेंगरायचा या विचारात मी मोडत नाही" असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## 'तेवढा मी शहाणा आहे मला अक्कल आहे'



लक्ष्मण हाके यांनी तुमच्यावर भरपूर टीका केली, मराठ समाजावर टीका केली, असा प्रश्न मनोज जरांगे यांना विचारला. त्यावर ते म्हणाले की, "शेवटी कर्ता-करविता छगन भुजबळ आहे. ओबीसी-मराठा वाद लावायचा तो ठरवतो, कोणी उठायचं, कोणी बसायचं हे तो ठरवतो. दुसऱ्यांना दोष देऊन अर्थ नाही. मला समाजकारण-राजकारण कळतं तेवढा मी शहाणा आहे मला अक्कल आहे, कर्ता-करविता कोण हे माहित आहे. दुसऱ्याला दोष देऊन उपयोग नाही हे त्याच्या समाजाला जनतेला कळतं" असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## दसरा मेळाव्याबद्दल काय म्हणाले?

"दसरा मेळाव्याबाबतही ते बोलले. दसरा मेळाव्याचा परिसर खूप मोठा आहे. 600-700 एकरचा परिसर आहे. गडावर खूप लोक येणार, ताकदीने येणार. अठरापगड जातीच लोक येणार. मी गडावर जाऊन विराट समुदायाचं दर्शन घेणार आहे. विजायदशमीच्या निमित्ताने दर्शन घेणार" असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## मराठ्यांचे कल्याण होऊ द्यायचे नाही, हे त्यांचे स्वप्न

"तिथे असणारा डेटा तुम्हाला खोटा वाटत असेल तर, तिथे असणाऱ्या हजारो वर्षांपूर्वीच्या वास्तू तुम्हाला खोट्या आहेत म्हणायचे का? हजारो वर्षांपूर्वीचे रेकॉर्ड तुम्ही ग्राह्य धरत नसाल, तर मग समित्या कशाला आहेत? आयोग कशाला आहेत मग? एखादी समिती चौकशीसाठी गठीत करतो ती कशासाठी असते? सिद्ध करण्यासाठी असते ना! हे सत्य आहे आणि हे अधिकृत माणण्यासाठी असते ना? मराठ्यांचे कल्याण होऊ द्यायचे नाही, हे त्यांचे स्वप्न आहे", अशी टीका मनोज जरांगे पाटील यांनी केली.



# बीड जिल्हा शल्यचिकित्सक पदी डॉ. अशोक थोरात यांची नियुक्ती.

## व तात्काळ पदभार स्वीकारला

**दैनिक लोकआरंभ//**

बीड प्रतिनिधी:-बीड : बीड जिल्हा सीएस म्हणून गेल्या वर्षभरापूर्वी अशोक बडे यांची नियुक्ती करण्यात आले होते, परंतु वर्षभरातच त्यांची बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी आता पूर्वी सीएस म्हणून बीड मध्ये काम केलले अशोक थोरात यांच्याकडेच हा पदभार देण्यात आला आहे. नियुक्ती होताच अशोक थोरात यांनी आज सकाळी 11 वाजता पदभार स्वीकारला.



बीडच्या जिल्हा शल्यचिकित्सक पदी डॉ. अशोक थोरात यांची नियुक्ती झाल्याबदल त्यांना शुभेच्छा देताना. रमेश पोकळे, अक्षय केंडे, हनुमान मुळीक, राहुल वाईकर, मुकेश जोगदंड

# कर्मवीर अण्णा शिक्षण क्षेत्रातील एक सूर्यच : डॉ. महेश गोलेकर

## केशवराज विद्यालय,दासखेड येथे डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३७ वी जयंती संपन्न.

**( बीड प्रतिनिधी )**

रयत शिक्षण संस्थेच्या केशवराज विद्यालय, दासखेड येथे संस्थेचे संस्थापक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 137 व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी श्री. रवींद्र औटे (उपसचिव गृहविभाग मंत्रालय, मुंबई ) डॉ.महेश गोलेकर ( माजी प्राचार्य, बीड ) श्री.शेकडे ए.बी. ( मुख्याध्यापक कंकालेश्वर विद्यालय, बीड ) श्री. पाठक बि.डी.( माजी मुख्याध्यापक) श्री.चारुहास कोकाटे (अध्यक्ष, स्थानिक स्कूल कमिटी) आदी मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत बोलताना डॉ. महेश गोलेकर यांनी, महाराष्ट्र राज्यात कर्मवीर अण्णांनी लावलेल्या शिक्षणरुपी रोपट्यामुळे आज शिक्षण क्षेत्रात संपूर्ण महाराष्ट्र उजळून निघाला आहे, त्यांच्या या कार्यास तोड नाही. तसेच शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या बालमनावर झालेले संस्कार हे कायमस्वरूपी प्रतिबिंबित होत असतात, म्हणून शाळेमध्ये शिक्षकाची भूमिका ही विद्यार्थ्यांना चौकोनी चिरा कसा होईल जेणेकरून समाजातील कोणत्याही क्षेत्रात तो यशस्वी होऊ शकेल. अशा प्रकारे विद्यार्थ्यांची जडणघडण करणे एका शिक्षकाचे आद्य कर्तव्य असते,असे उद्गार याप्रसंगी काढले. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात शिस्त लावून घेतल्यास तो जीवनात नक्कीच




यशस्वी होतो. आई वडिलांना दैवत मानून त्यांची सेवा केल्यास खऱ्या अर्थाने पुण्य मिळते. असे उद्गार प्रमुख अतिथी म्हणून बोलताना श्री. रवींद्र औटे यांनी केले. याप्रसंगी पुणे ग्रामीण पोलीस पदी निवड झाल्याबद्दल कु. ऋतुजा मोरे हिचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. गोल्हार सर, भाऊसाहेब कोकाटे, बंडू वाघिरे, हेमंत कोकाटे, जयवंत कोकाटे, भरत कोकाटे, पांडुरंग कोकाटे, उत्तरेश्वर कोकाटे, गणेश वाघ, शिवाजी कोकाटे,स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, शिक्षकवृंद, ग्रामस्थ, तसेच विद्यार्थी वर्ग आदी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# ४ऑक्टोबर लाभार्थींची निवड लॉटरी पद्धतीने होणार

बीड, दि 1:- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) बीड जिल्हा कार्यालयास सन 2023-2024 या आर्थिक वर्षाकरिता प्रकल्प मर्यादा ₹ 5 लाख असलेली सुविधा कर्ज योजने अंतर्गत 60 चे भौतिक उद्दिष्ट व ₹ 1.4 लाख प्रकल्प मर्यादा असलेल्या महिला समृद्धी योजने अंतर्गत 50 चे उद्दिष्ट आहे. उपरोक्त उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता स्थानिक व वर्तमान पत्रामध्ये बातमी देऊन कर्ज मागणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने महामंडळाच्या वेबसाईटद्वारे दिनांक 12 फेब्रुवारी 2024 ते 20 मार्च 2024 या कालावधीत कर्ज मागणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात अर्ज स्विकारण्यात आलेले आहेत. सुविधा कर्ज योजने अंतर्गत एकूण 549 कर्ज प्रकरणे प्राप्त झालेले असून त्यापैकी 497 पात्र व 52 अपात्र असून पात्र अर्जदारामधून चिठ्याद्वारे (लॉटरी पद्धतीने) लाभार्थींची निवड करावयाची आहे.

महिला समृद्धी योजने अंतर्गत एकूण 71 कर्ज प्रकरणे प्राप्त झालेले असून त्यापैकी 65 पात्र व 06 अपात्र असून पात्र अर्जदारामधून चिठ्याद्वारे (लॉटरी पद्धतीने) लाभार्थींची निवड करावयाची आहे.अपर जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष लाभार्थी निवड समिती बीड यांच्या अध्यक्षतेखाली दि. 04 /10/ 2024 रोजी सकाळी 11.00 वाजता साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृह नगर रोड, बीड या ठिकाणी चिठ्याद्वारे (लॉटरी पद्धतीने) लाभार्थींची निवड होणार आहे. संबधित पात्र अर्जदाराने उपस्थित राहावे. असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाये जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

# ग्रामरोजगार सेवकांना मासिक मानधन पंधरा वर्षाच्या संघर्षाला यश-भाऊराव प्रभाळे

बीड (प्रतिनिधी) दिनांक 30 सप्टेंबर च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत रोजगार सेवकांना मासिक 8000 मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र राज्यातील 29000 ग्राम रोजगार सेवक मागील अनेक दिवसापासून संघटनांच्या माध्यमातून आंदोलने, मोर्चे, उपोषणे करत आहेत आणि त्याचीच यश म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला यामागे प्रहार संघटनेचे मा बच्चू कडू साहेब व विविध संघटनेचे पदाधिकारी यांचा खूप मोठा वाटा आहे. अनेक वर्षानंतर फिक्स मानधन केले हे जरी खरे असले तरी ग्रामरोजगार सेवकांना नियुक्ती आणि बडतर्फ करण्यासाठी शासनाचे जे नियम आहेत ते रोजगार सेवकांना सुखाने जगू देणार नाहीत. ग्रामपंचायत ची निवडून आलेले बॉडी व त्यांचा मूड हा नेहमी ग्रामरोजगार सेवकांच्या मुळावर उठलेला असतो. त्यामध्येच अतिरिक्त रोजगार सेवकांची भरमसाठ भरती करण्यात आलेली आहे प्रत्येक ग्रामपंचायतलां अतिरिक्त रोजगार सेवक नियुक्त आहे त्यामुळे हे मानधन प्रत्येकी देणार की दोघांमध्ये विभागून देणार ही येणाऱ्या जीआर मध्ये स्पष्ट व्हायला हवे फिक्स मानधन असल्यामुळे ग्रामपंचायत आपल्या अधिकाराचा गैरवापर करून असंख्य रोजगार सेवकांना कमी करण्यासाठी प्रयत्न करणार आहेत यात तीळ मात्र शंका नाही त्यामुळे येत्या जीआर मध्ये याच्यावर देखील निर्बंध घालून अतिरिक्त रोजगार सेवक कमी करून मूळ रोजगार सेवकांना याचा फायदा व्हावा अशी अपेक्षा सबंध महाराष्ट्रातील रोजगार सेवक व संघटना करत आहेत.



खरंतर पंचायत समिती ते ग्रामपंचायत अंतर लक्षात घेऊन रोजगार सेवकांचे फिक्स मानधन किंवा प्रवास भत्ता ठरवायला हवा होता परंतु निवडणुकीच्या तोंडावर घाई गडबडीमध्ये हा निर्णय घेण्यात आलेला आहे जरी निर्णय झालेला असला तरी आज घडीला आम्ही सर्वजण या निर्णयाचे स्वागत करतो व निघणाऱ्या जीआर मध्ये सुधारणा करून रोजगार सेवकांची नोकरीची हमी निर्माण होईल अशी अपेक्षा करत आहोत. रोजगार हमीची एकूण जिम्मेदारी रोजगार सेवकांच्या कडे येऊन ठेपलेली आहे ग्रामसेवक यापासून अलिप्त आहेत त्यामुळे हे मानधन तुटपुंज असले तरी भविष्यात संघर्ष चालूच राहील आणि यामध्ये समाधानकारक वाढ करून घेण्यासाठी सर्व संघटना एकत्रित लढून प्रयत्नशील राहतील असे बीड जिल्हा रोजगार सेवक संघटनेचे अध्यक्ष कॉम्रेड भाऊराव प्रभाळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे म्हटले आहे.

# मोठी बातमी ! मनोज जरांगे हेच आमचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा; कुणी केली ही घोषणा?




मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट समाजातील विविध नेते घेत आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चुलत पणतू राजरत्न आंबेडकर यांनी देखील मनोज जरांगे यांची भेट घेतल्यानंतर हिंगोलीत प्रसारमाध्यमांना प्रतिक्रीया दिली आहे. ते यावेळी म्हणाले की मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी प्राण पणास लावले आहे. मराठा आरक्षणाकरिता लढा उभा केला आहे, त्याला पूर्ण पाठिंबा असल्याने मराठा समाजाने आम्हाला आमंत्रित केल आहे. महाविकास आघाडी आणि महायुती या पक्षांपासून आम्ही दूर आहोत. मनोज जरांगे यांचा पक्ष नसल्याने आम्ही त्यांना भेटायला आलो आहोत असेही राजरत्न आंबेडकर यांनी म्हटले आहे.राजरत्न आंबेडकर पुढे म्हणाले की आम्ही राजकीय पक्षांपासून दूर आहोत. आमचा खरा प्रतिनिधी आज उरलेला नाही. अनुसूचित जातीच्या 29 जागा आरक्षित असताना त्यापैकी 15 जागा तर बीजेपीने चोरलेल्या आहेत. जो पक्ष घटना संविधान हटविणार असे सांगत असतो तोच पंकजा मुंडे यांना आरक्षित जागेवर उभे करुन निवडून आणतो.बीजेपी संविधान संपविण्याची भाषा करते त्यांना आरक्षित जागेवर उमेदवार उभा करण्याचा नैतिक अधिकार आहे का ? असा सवालही राजरत्न आंबेडकर यांनी केला आहे. मराठा, मुस्लिम ,बौद्ध ,लिंगायत, मातंग, माळी या समाजाला एकत्र आणायला हवे, महाविकास आघाडी आणि महायुती हे पक्षीय राजकारण आहे, ते थांबलं पाहिजे आणि खरे प्रतिनिधी आपण सभागृहात पाठवले पाहिजे असेही त्यांनी यावेळी सांगितले. दसरा मेळाव्याला मनोज दादा त्यांचा निर्णय घेणार आहेत.त्याचवेळी आम्ही विजयादशमी साजरी करत असतो आणि तेव्हा या विजयाचा संपूर्ण प्लॅन आम्ही महाराष्ट्र समोर ठेवणार आहोत. मराठा, मुस्लिम, धनगर, लिंगायत, माळी, मातंग, बौद्ध हे लोक आमच्यासोबत असतील. जरांगे यांच्या अपोझिट काऊंटर आंदोलन उभे करण्याचे काम सागर बंगल्याच्या माध्यमातून होत असतं. काल-परवा आपल्याच टीव्हीच्या माध्यमातून दिसलं हे कशा पद्धतीने यांचे चरित्र आहे, भांडण लावण्याचे जे काम सुरु आहे. मराठा आणि ओबीसी यांचे भांडण लागलं पाहिजे. मराठा आणि ओबीसी जागृत झाला आहे, कुठेही तशा दंगली झाल्या नाहीत. त्यानंतर त्यांनी मराठा आणि बौद्ध यांच्यात दंगली होतात का याचीही चाचपणी केली, परंतु तसे काही झालं नाही असेही राजरत्न म्हणाले. विधानसभेमध्ये आमचे उमेदवार गेले तर ते मराठा आरक्षणाचा मुद्दा लावून धरतील. आम्हाला हवा त्या पद्धतीने आम्ही रिझल्ट दिला तर आमचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा हा मनोज जरांगे असतील असेही शेवटी राजरत्न आंबेडकर यांनी सांगितले. सिद्धार्थ मोकळे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली त्यासंदर्भात विचारले असता राजरत्न म्हणाले की राजकारणात नैतिकता राहीलेली नाही. जे इतकी वर्षे एका पार्टीत राहीले ते रात्रीचे उठून दुसऱ्या पार्टीत जातात. उद्या तेही भाजपात गेले तर कोणलाही मोठा धक्का वगैरे बसणार नाही.अल्पसंख्यांक मंत्री किरण रिजिजू दौरा करीत आहेत. आमच्याही आंबेडकर फॅमिली मधल्या एक दोन सदस्य त्यांच्या गळाला लावण्यासाठी प्रयत्न करीत होते, त्यांचा प्रयत्न अयशस्वी ठरला आहे,

## बीड विकासाचा खेळखंडोबा करणाऱ्या जयदत्त क्षीरसागरांचे अनुकरण करण्याची अनिलदादा जगताप यांना गरज नाही

## जयश्रीताई विधातेंच्या टिकेला शिवसेना जिल्हा समन्वयक दीपक काळे यांचे सणसणीत प्रतिउत्तर!

बीड, प्रतिनिधी- गेल्या अनेक वर्षांपासून सत्ता भोगून बीड विकासाचा खेळ खंडोबा करणाऱ्या जयदत्त क्षीरसागर यांना सत्तेच्या मोहापुढे स्वतःचे पुतणे सांभाळता आले नाहीत त्या जयदत्त अण्णांच्या बगलबच्यांनी आम्हाला क्षीरसागरांनी न केलेल्या विकासाचे ज्ञान पाजाळू नये. स्वतःची राजकीय पोळी भाजण्यासाठी बीड मतदार संघात अचानक सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम आयोजित करायचे त्यात स्वतःच्या संस्थेतील कर्मचारी गोळा करून विकासपुरुष म्हणून मिरवायचे आणि मतांची भीक मागायची असला भिकारचोट धंदा आजवर शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांना कधी जमला नाही आणि यापुढेही ते कधी करणार नाहीत. जयदत्त अण्णा क्षीरसागर विकास मंचाच्या महिला आघाडी प्रमुख सौ. जयश्रीताई विधाते यांनी अगोदर माजी मंत्री क्षीरसागरांनी बीड मतदार संघात जन्माला घातलेला विकास शिवसेना मध्यवर्ती कार्यलयात घेऊन यावा म्हणजे निदान आम्हा शिवसैनिकांना तरी जयदत्त अण्णांच्या



विकासाचे दर्शन घडेल व त्यानंतर मग आम्हाला देखील त्याचे अनुकरण करता येईल असे सणसणीत प्रतिउत्तर शिवसेना जिल्हा समन्वयक दिपक काळे यांनी जयश्रीताई विधाते यांनी केलेल्या टिकेला दिले आहे. काल रोजी जयश्रीताई विधाते यांनी जयदत्त अण्णांच्या होम मिनिस्टर कार्यक्रमाचे अनुकरण करूण्याऐवजी अण्णांनी केलेल्या विकसाचे अनुकरण केले असते तर बरे झाले असते अशी टिका अनिलदादा जगताप यांचे नाव न घेता केली होती व याबरोबर प्रत्येक कार्यक्रमात त्या आपल्या भाषणात वारंवार हीच टिका करत आहेत. याच टिकेला प्रतिउत्तर देण्याकारिता शिवसेनेच्या दीपक काळे यांनी पत्रक जाहीर करून जयश्रीताई यांचा चांगला समाचार घेतला आहे. या पत्रकात दिपक काळे यांनी पुढे म्हंटले आहे की, आजवर क्षीरसागर यांनी केवळ बीडकरांची दिशाभूल करून बीडच्या विकासाची गळचेपी केली आहे. म्हणूनच आज बीड मतदार संघात क्षीरसागर मुक्तीचा सूर उमठला आहे. माणुसकीचा खरा चेहरा म्हणून जिल्हाप्रमुख अनिलदादा यांची ओळख बीड मतदार संघात आहे. राजकारणाच्या मापदंडात राहून अनिलदादांनी समाजसेवेचा तप केला आहे म्हणूनच आजच्या तिथीला गाव, वस्ती, वाडा तांड्यावरून लहानपासून ते थोरापर्यंतची माणसं अनिलदादा यंदा तुम्ही आमदार व्हा अशी आर्तहाक देत मानतील इच्छा व्यक्त करत आहेत. त्यामुळे अनिलदादा यांना विकासाच्या भूल थापा मारून स्वघोषित विकासपुरुष म्हणून मिरवणाऱ्या जयदत्त क्षीरसागर यांचे व राजकीय फायद्यापोटी घेण्यात आलेल्या कार्यक्रमांचे अनुकरण करण्याची गरज नाही. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली बीडमध्ये साकार होत असलेली होम मिनिस्टर खेळ पैठणीचा ही स्पर्धा केवळ महिला भगिनींच्या मनोरंजनासाठी आयोजित केली आहे. यामधून अनिलदादा जगताप यांना कुठलीही स्वतःची राजकीय प्रसिद्धी करून घ्यायची नाही व त्याची अनिलदादांना गरज सुद्धा नाही. यामुळे साहजिकच बीड मतदार संघात स्वतःच्या राजकीय फायदा बघून वार्डनिहाय आयोजित केलेल्या होम मिनिस्टर स्पर्धेचे अनुकरण अनिलदादांना करायचेच नाही याची नोंद जयश्रीताईंनी घ्यावी अशा शब्दात शिवसेना जिल्हा समन्वयक दीपक काळे यांनी जयश्रीताई विधाते यांनी केलेल्या टिकेचा समाचार घेतला आहे.

## शासनाने विधवा महिलांना देण्यात येणारी सानुग्रह मदत त्यांना त्यांच्या हयातीपर्यंत द्यावी - सीमाताई घरत



उरण दि १(उरण प्रतिनिधी )पतीच्या निधनानंतर सरकार विधवां महिलांना सानुग्रह अनुदान मदत म्हणून देते.मात्र त्यांचा मुलगा सज्ञान म्हणजे १८ वर्षांचा झाला की देण्यात येत असलेली सानुग्रह अनुदानाची मदत बंद करते.विधवा महिलांना देण्यात येत असलेली सानुग्रह अनुदान मदत बंद न करता, त्यांना ती मदत त्यांच्या हयातीपर्यंत द्यावी.असे आवाहन रायगडभूषण सीमाताई अनंत घरत यांनी केले. उरण चारफाटा येथे शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते मोरेश्वर भोईर यांच्या एस्टिस्टड जवळ कार्यालयात शेकापतर्फे निराधार महीलांचा साडी देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळीउरण महिला आघाडीच्या अध्यक्षा सीमाताई घरत,नयना पाटील,केगाव ग्रा.पं.चे सरपंच विना नाईक यांचा सरपंच म्हणून सत्कार करण्यात आला.उरण तालुका सहचिटणीस यशवंत ठाकूर,आगरी,कराडी,कातकरी समाजिक संस्थेचे अध्यक्ष मोरेश्वर भोईर,चाणजे ग्रा.पं.चे माजी सरपंच प्रदीप नाखवा, माजी जिल्हा परिषद सदस्य सिताराम नाखवा, केगाव उपसरपंच चिंतामण जी ,शंकर भोईर, सुरेखा महाले,नाहिदा ठाकूर,सुप्रिया म्हात्रे , वामन तांडेल, पत्रकार ॲड.शेखर पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.यावेळी श्रीगणेशाचे पुजन विधवा महिलांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सावित्रीबाई फुले व समाज सेवक प.शि.म्हात्रे यांच्या प्रतिमेस विधवा महिलांच्या हस्ते पुष्पहार घालून प्रतिमांचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राभाऊ म्हात्रे यांनी केले.यावेळी मोरेश्वर भोईर आणि टिम यांनी प्रत्येक विधवा महिलांना साडीची भेट दिली.

## स्वत:तील कलागुणांना ओळखून संधी देणे गरजेचे - प्रा. जगदीश संसारे



मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : ‘प्रत्येक व्यक्तीत काहीना काही गुण असतात फक्त ते ओळखणे गरजेचे असते. स्वतःतील कलागुणांना ओळखून संधी देणे गरजेचे आहे’, असे मत सेंट जोसेफ महाविद्यालयातील मराठी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक जगदीश संसारे यांनी व्यक्त केले. सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती माणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालयातील माजी विद्यार्थिंनी समिती आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माजी विद्यार्थिनींचे स्नेहसंमेलन २०२४-२५च्या निमित्ताने ‘वेध भविष्याचा’ या मार्गदर्शनपर व्याख्यानाच्या निमित्ताने ते बोलत होते. सदर कार्यक्रम २९ सप्टेंबर २०२४ रोजी आभासी पद्धतीने घेण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनीं आर. जे. माधवी पवार हिने ‘तू बुध्दी दे’ या गीतापासून केली. जीवनात यशस्वी होणे प्रत्येकाच्याच हाती आहे असं नाही, पण प्रयत्नवादी कधी अयशस्वी होत नाहीत. स्वप्नाकडून सत्याकडे जाणारा मार्ग अस्तित्वात आहे फक्त तो शोधण्याची दृष्टी आणि धैर्य तुमच्या अंगी असायला हवे, असे मत प्रा. जगदिश संसारे यांनी व्यक्त केले. “आज अनेक विद्यार्थिनी शिक्षण, सांस्कृतिक, सामजिक क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटवित आहेत आणि या यशामागे महाविद्यालयाचे संस्कार आहेत, हे विसरून चालणार नाही.” असेही ते म्हणाले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अर्चना पत्की आणि माजी विद्यार्थिंनी समितीच्या समन्वयक डॉ. सरिता कासरलकर यांनी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ. रश्मी शेट्ये तुपे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. सुप्रिया शिंदे यांनी केले. या कार्यक्रमात ४० माजी विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

## श्रीमती तारामाई वर्तक मेमोरियल ॲकॅडमीच्या प्रांगणात ग्रॅण्डपॅरेंट्स डेफमोठ्या उत्साहात साजरा

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : श्रीमती तारामाई वर्तक मेमोरिअल ॲकॅडमीच्या प्रांगणात आगाशी - विरार - अर्नाळा शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष विकास नरसिंह वर्तक ह्यांच्या संकल्पनेने “ग्रॅण्डपॅरेंट्स डे” मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. सध्याच्या तंत्रज्ञान व व्यस्त युगात पालक मुलांसाठी संपूर्ण वेळ देऊ शकत नाहीत. अशा वेळी आजी-आजोबा ही भूमिका चोख बजावतात. मुलांना संस्कार देतात. नातवंडांना जीवनाचे महत्त्व शिकवतात. असे घराचे आधारस्तंभ असलेल्या, थोर व्यक्तिमत्व असलेल्या आजी-आजोबांचा सन्मान झालाच पाहिजे ह्याचे बाळकडू शालेय वयापासून देणे गरजेचे आहे. ह्याच संस्कारासाठी आवारात प्रथमच ग्रॅण्डपॅरेंट्स डे मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.



सदर कार्यक्रमासाठी अध्यक्ष विकास वर्तक आणि पल्लवी वर्तक यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून ‘ग्रॅण्डपॅरेंट्स डे’ चे महत्त्व सांगत शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात बालवाडी ते इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत व भाषणे सादर करून आपले आजी-आजोबांवरचे प्रेम व्यक्त केले. शिक्षकवृदांनी आजी-आजोबांसाठी नाटिका व गीत सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. शाळेच्या मुख्याध्यापिका रंजना कोळवणकर यांनी आपल्या जीवनात असणारे आजी-आजोबांचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. माध्यमिक विभागाच्या प्राचार्य रचना शर्मा यासुद्धा कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता पाचवीतील विद्यार्थी स्वरूप गायकवाड व आरोही चान्सीकर ह्यांनी केले.

सदर कार्यक्रमास संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले. सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमाने कार्यक्रम बहारदार झाला आणि नातवंडे व आजी-आजोबा आनंदी झाले.

## लिंबागणेश महसूल मंडळाची आढावा बैठक संपन्न ; तहसीलदार शेळकेंकडुन समस्यांचे निराकरण; शेतकरी ,ग्रामस्थ समाधानी :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- ( दि.१) आज दि.१ मंगळवार रोजी लिंबागणेश महसूल मंडळाची मंडळस्तरीय बैठक बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लिंबागणेश येथे संपन्न झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळ अधिकारी अशोक डरपे यांनी केले.या बैठकीत प्रशासकीय योजना व प्रलंबित कामांचा आढावा घेण्यात आला. सदर बैठकीस लिंबागणेश मंडळातील पंचक्रोशीतील सरपंच व ग्रामस्थ मंडळ अधिकारी, तलाठी,कृषी सहाय्यक, ग्रामसेवक, बीएलओ, पर्यवेक्षक, स्वस्त धान्य दुकानदार, शेतकरी आदी उपस्थित होते. बैठकीच्या सुरूवातीला मंडळातील उपस्थित शेतकरी सर्वसामान्य लोकांच्या अडीअडचणी विचारून त्यावर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुचना दिल्या.तहसिलदार शेळके यांनी स्वतः समस्यांचे जागेवरच निराकरण करण्यासाठी पुढाकार घेतल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. तलाठी आणि ग्रामसेवक यांना पाणंद रस्त्यांची मोजणी, अतिक्रमण काढण्याच्या सुचना दिल्या.कृषी विभागातील कृषी सहाय्यक यांचेकडून अतिवृष्टीमुळे नुकसानीचे पंचनामे झाले असल्याची खात्री केली. अतिवृष्टीबाबतचे पंचनामे करणे,अ ब क ड या नमुन्यांमध्ये तलाठी व ग्रामसेवक यांनी मिळून वेळोवेळी संयुक्त अहवाल दाखल करणेबाबत सुचना दिल्या. उपस्थित ग्रामसेवक आणि तलाठी यांच्या कार्याचा आढावा घेतला. महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे व्यवस्थापक यांना थकीत पिककर्ज शेतकऱ्यांच्या बचत खात्याला होल्ड लाऊ नयेत असा सुचना दिल्या. महावितरणचे सहाय्यक अभियंता देशपांडे यांना महावितरण संबंधित समस्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या सूचना दिल्या. मस्के यांनी रेशीम तुती पालन विषयी माहिती दिली.

तहसीलदार शेळके यांचे बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम महाराज लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, पोखरी ( घाट) चे सरपंच बिभीषण मुळीक, पिंपरनई सरपंच बाळासाहेब वायभट , ग्रामसेवक वीर, तलाठी पोतदार यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. लिंबागणेश पंचक्रोशीतील शेतकरी आणि ग्रामस्थांच्या वतीने डॉ.गणेश ढवळे यांनी तहसीलदार शेळके यांचे आभार मानले.
मुळुकवाडी - मसेवाडी शिवरस्त्याचा प्रश्न सोडविण्याचे आश्वासन :- डॉ.गणेश ढवळे
मुळुकवाडी -मसेवाडी शिवरस्त्याची मोजणी करण्याचे आदेश देऊन दिड वर्ष उलटूनही अद्याप मोजणी न केल्याने निधी परत गेला असुन रस्त्याच्या दुरावस्थेमुळे पावसाळ्यात शाळकरी मुले व ग्रामस्थांचे हाल होत असुन तातडीने मोजणी करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांच्यासह मसेवाडी ग्रामस्थांनी मांडल्यानंतर आठवडाभरात रस्त्याशेजारी व शेतजमीन मालकांना नोटीस बजावुन पोलिस संरक्षणात स्वतः जागेवर येऊन रस्त्याची मोजणी करून देण्याचे आश्वासन देत संबंधित अधिकारी यांना सुचना दिल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत तहसीलदार शेळकेंचे आभार मानले.



# मला गोळ्या घातल्या तरी मी थांबणार नाही,लक्ष्मण हाकेंच्या वैद्यकीय चाचणीचा रिपोर्ट त्यांनी दारु प्यालेली नव्हती

ओबीसी समाजाचे आंदोलक लक्ष्मण हाके यांनी मद्यप्राशन करुन वाद घातल्याचा आरोप काही तरुणांनी केला. सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करुन लक्ष्मण हाके यांनी वाद घातल्याचा दावा मराठा तरूणांनी काल केला होता. आता या मुद्यावर लक्ष्मण हाके यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी त्यांची बाजू स्पष्ट केली. ओबीसी आंदोलनाला बदनाम करण्याचा हा डाव आहे, असा आरोप लक्ष्मण हाके यांनी केला. कालच्या राड्यामागे संभाजीराजे छत्रपती आहेत. मला जीवे मारण्याचा प्रयत्न होता, असा आरोप त्यांनी केला आहे. पण मला गोळ्या घातल्या तरी मी थांबणार नाही, असेही हाके म्हणाले.



दरम्यान कालच्या राड्यानंतर हाके यांची सुरक्षा वाढण्यात आली आहे. काल मराठा आंदोलक आणि लक्ष्मण हाके समोरासमोर आले होते. त्यानंतर आता नागपूर पोलिसांनी हाकेंची सुरक्षा वाढवली आहे.मी वॉकिंगला गेलो असता 5 वाजता मला तो मुलगा भेटला होता. त्या मते नावाच्या मुलाचा सीडीआर किंवा मोबाईल तपासला तर त्याने कुणाकुणाला कॉल केले याचे डिटेल्स जरी घेतले तरी त्यांचा कसा पूर्वनियोजित कट होता, ते समजेल. ओबीसी आंदोलनाला बदनाम करण्याचा हा डाव आहे, असा आरोप लक्ष्मण हाके यांनी केला. लक्ष्मण हाके यांच्यावर दारू प्यायल्याचा आरोप झाल्यानंतर त्यांची ससून रुग्णालयात वैद्यकीय चाचणी करण्यात आली. त्याचा प्राथमिक अहवाल समोर आला आहे. हाके यांनी दारू प्यायली नव्हती असा निष्कर्ष डॉक्टरांनी काढला आहे. याच मुद्याची आणखी खात्री करण्यासाठी लक्ष्मण हाके यांच्या रक्ताचे नमुने चाचणीसाठी वैद्यकिय प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आलेत. त्यांचा अहवाल येण्यासाठी आणखी एक दोन दिवस लागू शकतात, असे समजते.

## खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्यावर केली टीका

पण याही पलीकडे जाऊन कोल्हापूरचा एक नेता ,स्वत:च्या अस्तित्वासाठी धडपडणारा, त्यांना मी फक्त कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक न्यायाच्या धोरणाची आठवण करून दिली. छत्रपती शिवरायांच्या रयतेच्या राज्याची आठवण करून दिली आणि महाराष्ट्रात असलेल्या 50 ते 60 टक्के ओबीसी हा आम्ही छत्रपती शिवरायांना मानणारे आहोत, त्या गादीला मानणारे आहोत. कोल्हापूरचा तो नेता रयतेचा राजा असता तर तो ओबीसींच्या आंदोलनालाही भेट द्यायला आला असता, ही माफक अपेक्षा ओबीसींचा नेता म्हणून महाराष्ट्रासमोर मांडली. आम्ही तुम्हाला राजा का म्हणावं ? हा प्रश्न फक्त कोल्हापूरच्या संभाजी भोसले यांना मी विचारला. मला वाटलं ते हे खिलाडू वृत्तीनं घेतील, काही आत्मपरीक्षण करेल, छत्रपतीं शिवरायांच्या रयतेचा कसा कारभार होता, ते पाहील. किंवा सामाजिक न्याया देणाऱ्या छत्रपती शाहूराजांचे विचार पाहील. पण त्या माणसाने माझ्या अंगावरीत मारेकरी घातले, असा गंभीर आरोप लक्ष्मण हाके यांनी केला.

## श्रीराम मालाणी यांचे निधन



माजलगाव दि.१ (प्रतिनिधी)-शहरातील शाहूनगर येथील राहवाशी आणि प्रसिद्ध कापडाचे व्यापारी असलेले श्रीराम बन्सीलाल मालाणी यांचे सोमवारी (दि.३०) रात्री ११.३० च्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. श्रीराम बन्सीलाल मालाणी हे प्रसिद्ध कापडाचे व्यापारी म्हणून सर्वदूर परिचित होते.सोमवारी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली.मृत्युसमयी ते ६० वर्षांचे होते. मंगळवारी सकाळी त्यांच्या पार्थिवावर राजस्थानी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.विशाल,रवी यांचे ते वडील होते,त्यांच्या पश्चात पत्नी,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे.प्रजापत्रचे सहसंपादक संजय मालाणी यांचे ते चुलते होते.दरम्यान मालाणी परिवाराच्या दुःखात लोकआरंभ परिवार सहभागी आहे.

## गांधी जयंती निमित्त गांधी बाल मंदिर हायस्कूल मध्ये स्वच्छ भारत अभियान




-स्वच्छता ही सेवा 2ऑक्टोबर गांधी जयंती निमित्त 3 महाराष्ट्र बटालियन आर्मी विंग तर्फे स्वच्छ भारत अभियान रॅली आयोजित करण्यात आली होती . या अभियानात शालेय परिसर,आसपासचा परिसर स्वच्छ करण्यात आला.यात महानगरपालिकेचे कर्मचारी सहभागी होते . सदर कार्यक्रमात स्काऊटचे प्रमुख अवधूत चव्हाण सर ,आर एस पी प्रमुख अमोल जागले सर ,अर्चना सातपुते मॅडम सहभागी झाले होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन एनसीसी कमांडर श्री विश्वनाथ पांचाळ सर यांनी केले होते. सदर कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक श्री अनिल पांचाळ सर, पर्यवेक्षक श्री रवींद्र खोंडे सर यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## कोल्हापूर येथील १९ व्या संमेलनात नृत्यकला पुरस्काराने कु प्रिती नामदेव यमगर मुंबई सन्मानीत.




१९ व्या राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलनात कु प्रिती नामदेव यमगर मानखुर्द मुंबई यांना नृत्यकला प्रेरणा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले

सदरचा पुरस्कार डॉ श्रीकांत पाटील प्रसिद्ध कांदबरीकार यांचे ‘ हस्ते आणि संमेलन अध्यक्ष प्रा पी एस पाटील डॉ रामचंद्र चोथे दादासाहेब शेख ‘ भाऊसाहेब कांबळे अशोक मोहिते शैलजा परमणे प्रा संतोष जोईल सुशिल डवर आणि संमेलन आयोजक कवि सरकार इंगळी यांच्या उपस्थीत २९ सप्टेंबर २४ रोजी देऊन त्यांना सन्मानीत करण्यात आले . त्यांना पुरस्कार मिळालेने त्यांचे कलाक्षेत्रात कौतुक होत आहे.

कवि सरकार स्वाभिमानी वाचनालय इंगळी आयोजित कोल्हापूर येथे

## आळंदी- आपुलकी वृद्धाश्रमास भेट...

दि. २१/०९/२०२४ रोजी आळंदी येथील आपुलकी वृद्धाश्रमास भेट देण्याचा योग आला.नाना पाटेकर सिंधुताई सपकाळ यांच्या प्रेरणेने प्रेरित होऊन हा आश्रम काढल्याचा समजले. भागवत मुरलीधर बोराडे हे तेथील स्वयंसेवक आहेत. तेथे सध्या वीस वृद्धांची सोय केलेली आहे. आश्रम खूप टापटीप स्वच्छ आहे. प्रत्येकाला त्यांच्या नावाचे पलंग आहेत. करमणुकीसाठी विविध साधन आहेत.तेथील एक ९२ वर्षाच्या आजी आहेत त्या खूप हसत खेळात जीवन व्यतीत करताना दिसल्या. त्या म्हणाल्या “ माझ्या घरी ट्रक भरून माणसं आहेत. पण बघायला कोणी नाही हा दैवाचा खेळ आहे.”

“इथे मला सगळे वेळेवर मिळतं. इथले सर्व छान काळजी घेतात.” आणि त्या आमच्याशी एवढ छान बोलत होत्या की जसे काही आम्ही त्यांच्या कोणी लागत होतो. डोळ्यातून आपोआप पाणी ओघळत होते.

त्यांनी अगदी तोंडभरून आशीर्वाद दिले.एक आज्जी साधारण ८० वर्षाच्या असाव्यात. त्यांनी देखील त्यांची कहाणी सांगितली. एकुलती एक मुलगी होती ती गेली. आता नातवंडांवरती आपला भार नको. म्हणून त्या इथे आल्या. त्यांनी मला विचारलं “तुला मुलं किती आहेत ग.?” मी म्हटलं “तीन मुल आहेत.” त्यांनी माझ्या मुलांसाठी शुभ आशीर्वाद दिले. खूप समाधान वाटते हे सगळं करत असताना.त्या सर्वांना बिस्कीटचे पुडे खाऊ म्हणून नेले होते. हा खाऊ अगदी साधा होता, मला तिथे गेल्यावर समजले इथे असा वृद्धाश्रमा आहे.मी अजून काही वेगळे नेले असते.पण तेवढ्यावरही हे खुश झाले होते. तेथील हे वृद्ध मंडळी करमणुकीसाठी हसतात, नृत्य करतात.आनंद घेतात. आपल्यासारखे कोणी भेटायला गेले की आनंदाने मोहरून जातात.

मला अशा वृद्धांची सेवा करायला आवडते. त्यांना भेट वस्तू द्यायला आवडतात.

माझ्याबरोबर काव्ययोग संस्थेचे कवी, कवयित्री व संस्थापक योगेश हरणे व गौरव पुंड हे दोघे होते.

तसेच शिवछत्रपती विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. सानप सर यांच्यामुळे आश्रमास भेट देता आली.

## देवगिरी महाविद्यालयाचा अथर्व पळसकर ठरला मिलिंद वक्ता

छत्रपती संभाजीनगर(चैताली औटे) मिलिंद कला महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर आयोजित अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्हास्तरीय आंतर महाविद्यालयीन वकृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून देवगिरी महाविद्यालयाचा अथर्व पळसकर हा मिलिंद वक्ता ठरला आहे. शनिवारी झालेल्या या जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेत अथर्व पळसकर याने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक रोख



रक्कक,सन्मानचिन्ह,सन्मानपत्र मिळवत मिलिंद वक्त्याचा मान पटकावला.या यशाबद्दल देवगिरी महाविद्यालयाच्या वतीने त्याचा आज सत्कार करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय श्री अशोक तेजनकर सर, उप-प्राचार्य डॉ. विष्णू पाटील, डॉ.अपर्णा तावरे,डॉ. निपाने सर आणि मराठी विभागप्रमुख डॉ समिता जाधव, डॉ. एस. बी. शिंदे आदी उपस्थित होते.

## मनसेच्या आंदोलनाचा दणका

दिनांक 30/ 8/ 2024 रोजी खालील रस्त्यासाठी रस्ता रोको आंदोलन केलेली होती त्यावेळी निवेदनात 30/09/2024 सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगाव यांच्या कार्यालयास कुलूप ठोकण्याचे निवेदन देण्यात आले होते या आंदोलनाच्या आधीच, उप अभियंत्यांनी लेखी पत्र दिले. पाऊस कमी होताच हायवे ते शिंपी टाकल पर्यंत चा रस्त रस्त्याचे खड्डे बुजवण्यात येईल त तसेच इजिमा 58 वरील काम जिल्हा नियोजन वार्षिक योजनेअंतर्गत झालेले आहे. तो रस्ता खराब झालेला आहे.तो रस्ता पाऊस कमी झाल्यास तात्काळ तो पुन्हा करण्यात येईल असे लेखी आश्वासन संबंधित कार्यालयाने दिलेले आहे मनसे माजलगाव च्या वतीने जेव्हा जेव्हा आंदोलन केले त्या प्रत्येक आंदोलन यश आले व ते काम पूर्ण झाले 1) जय महेश साखर कारखाना वरील परप्रांतीच्या विरोधी केलेले आंदोलन 2)शहरातील स्वच्छालय 2) नॅशनल हायवे ते लहानेवाडी या रस्त्याची मनसेच्या आंदोलनामुळे डांबरीकरणाचे काम पूर्ण होत आहे अनेक आंदोलने यशस्वी झाले व काम पूर्ण झाले. त्यामुळे मनसे कोणतेही प्रश्न आधारे सोडत नाहीत. 30 /09 /2024 सकाळी 9 वाजता पत्र दिले.

## लोकसभा निवडणुकीत ४८ पैकी १४ मतदार संघात व्होट जिहाद, फडणवीसांचा आरोप काय?

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी व्होट जिहादवरुन गंभीर आरोप केला आहे. लोकसभा निवडणुकीत व्होट जिहादमुळंच पराभव झाला. एकगठ्ठा मतांमुळं हिंदुत्ववाद्यांच्या पराभवाची रणनीती आखण्यात आल्याचा आरोप फडणवीसांनी केला आहे. 48 पैकी 14 मतदारसंघात व्होट जिहाद झाल्याचं फडणवीसांचं म्हणणं आहे. मुस्लिमांच्या एकगठ्ठा मतांमुळं महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा विजय झाला असं सांगतानाच फडणवीसांनी धुळे लोकसभा मतदारसंघाचं उदाहरण



दिलं. धुळे लोकसभा मतदारसंघात काँग्रेसच्या शोभा बच्छाव यांनी भाजपच्या सुभाष भामरेंचा अवघ्या 3 हजार 831 मतांनी पराभव केला. धुळे ग्रामीणमध्ये भाजपच्या भामरेंना 1 लाख 39 हजार 721 मतं मिळाली तर शोभा बच्छाव 75 हजार 923 मतं मिळाली इथं भामरेंनी आघाडी घेतली 63 हजार 798 मतांची. धुळे शहरमध्ये भामरेंना 93 हजार 262 मतं आणि बच्छाव यांना 88 हजार 438 मतं. भामरेंना आघाडी आहे, 4 हजार 824 मतांची शिंदखेडा भामरेंना 1 लाख 11 हजार 849 आणि बच्छाव यांना 68 हजार 424....भामरेंना आघाडी आहे, 43 हजार 425 मतांची बागलान भामरेंना 1 लाख 166 मतं आणि बच्छाव यांना 78 हजार 253 मतं...भामरेंना आघाडी आहे, 21 हजार 913 मतं मालेगाव बाह्या मध्ये भामरेंना 1 लाख 27 हजार 454 मतं आणि बच्छाव यांना 72 हजार 242 मतं... भामरेंना आघाडी आहे, 55 हजार 212 मतांचीमालेगाव मध्य भामरेंना फक्त 4 हजार 542 मतं मिळाली आणि बच्छाव यांना तब्बल 1 लाख 98 हजार 869 मते. इथंच शोभा बच्छाव यांनी पाचही मतदारसंघाची पिछाडी भरुन काढली. मालेगाव मध्य मध्ये बच्छाव यांना आघाडी आहे. तब्बल 1 लाख 94 हजार 327 मतांची. हा मतदारसंघ मुस्लीम बहुल आहे. इथूनच पंजावर प्रचंड मतदान झालं.

## डिजिटल - बोलणारी परसबाग खारदांडा मुंबई पब्लिक शाळेचा एक अभिनव उपक्रम

प्रतिनिधी -अजय शिवराम गणविर बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विद्यार्थ्यांना ज्यांना जागेच्या कमतरतेमुळे परसबाग काय असतो? याची जाणीव नसतो. म्हणून याची अनुभव व अनुभूति तसेच वृक्षवेली परसबाग, विविध प्रकारच्या भाज्या, फळे, औषधी वनस्पती,निसर्गविषयक आवड निर्माण करणे तसेच शाळेच्या निसर्गरम्य परिसर तयार करने हे उद्देश्य समोर ठेवून - मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा योजना टप्पा २ अंतर्गत खारदांडा मुंबई पब्लिक शाळा संकुल येथे एक नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेत - डिजिटल बोलाबारी-परसबाग तयार करण्यात आली. 21 व्या शतकातील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाशी सांगड घालत शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती- श्यामा आर सिंह मॅडम यांनी शाळेचे तंत्रस्नेही व आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार पुरस्कृत श्री.राकेश चुटे सर यांच्या सहकार्यान QR code निर्मिती तसेच शाळेचे माळी श्री.अविनय शाळगांवकर, शाळेचे वरिष्ठ शिक्षक श्री. श्रीराम चौरसिया सर, श्रीमती.सविता शुक्ला, श्रीमती. संगीता रॉड्रिग्स, श्री. सूर्यकांत पाटील सर, श्री.अजय गणवीर सर ,श्री. गोरक्ष आखडकर, श्रीमती. विद्या महाजन, श्रीमती. वंदना गणवीर, शाळेचे शिपाई विरश्री कांबळे,अनिता जाधव BVG स्टाफ या सर्वांच्या सहकार्याने,सहयोगाने चिकाटी,लगन मेहनतीने, मदतीने शाळेत डिजिटल अशी बोलणारी परसबाग तयार केली. डिजिटल - बोलणारी परसबागेत विविध प्रकारच्या पाल्याभाज्या, फळे, फूलांचे झाडे औषधी वनस्पति यांचा समावेश आहे.

या डिजिटल परसबागेत प्रत्येक झाडाला त्याचा नावा सोबत एक QR code दिला आहे. झाडाला लागलेला QR code scan केला की त्या झाडाची माहिती देणारा एक विडियो समोर येतो जो शाळेच्या विद्यार्थ्यांकडून प्रस्तुत केलेला आहे. सोबतच त्या विडियो मधे त्या झाडाची माहिती video व Text दोन्ही फॉर्मेट मधे उपलब्ध करून दिलेली आहे.

या डिजिटल युगाच्या डिजिटल बोलणारी परसबागतून मिळणाऱ्या पाले भाज्या शाळेतील विद्यार्थी आपल्या शालेय पोषण आहार योजना अंतर्गत येथे मिळणाऱ्या मध्यान्ह भोजन मधे सॅलड व आहारात घेत असतात.

बृहन्मुंबई शिक्षण विभागातील एच पश्चिम विभागाचे प्रशासकीय अधिकारी श्रीमती. संगीता डोईफोडे मॅडम, विभाग निरीक्षक श्रीम.अनुराधा मॅडम,श्री.संतोष जाधव सर, श्रीमती- सुनीता भांगरे मॅडम व H/W वार्ड चे सर्व मुख्याध्यापक, इंचार्ज शिक्षक, शाळा संकुलातील सर्व शिक्षकवृंद इतर कर्मचारी तसेच परिसरातील पालकवर्ग परसबागेला भेट देऊन परसबागेला आपला मार्गदर्शन,सहकार्य सतत देत असतात.

या डिजिटल -बोलणारी परसबागेची चर्चा संपूर्ण बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागात धुमाकूळ करत आहे. याचा पूर्णपणे श्रेय खारदांडा शाळा संकुल इमारतीच्या प्रमुख श्रीमती.श्यामा आार. सिंह मॅडम ला जात आहे. त्यांच्या नवकल्पकते व उपक्रमशील वैचारिक दृष्टिकोनातून शाळेत असे विविध नवोपक्रम राबवित असतात.

## वाचनसंस्कृतीत समाजाचा ऱ्हास रोखण्याची शक्ती!

ठाणे - 22 “ मूल्य, नीतिमत्ता, तत्व हरविलेला समाज बदलायचा असेल तर वाचनसंस्कृतीची चळवळ अतिशय निग्रहपूर्वक पुढे न्यावी लागेल. शारदा प्रकाशन वाचनसंस्कृती वाढविण्याचे मोलाचे कार्य करीत आहे. सर्वांनीच याला हातभार लावला तर कोसळणाऱ्या समाजाचा ऱ्हास वाचनसंस्कृतीमुळे रोखला जाईल,असा आशावाद नाटककार आणि नॅशनल एज्युकेशन पॉलिसीचे सदस्य प्रा. डॉ. प्रदीप ढवळ यांनी व्यक्त केला.

शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या तीन पुस्तकांच्या मराठी ग्रंथ संग्रहालयातील कार्यक्रमात आयोजित प्रकाशन सोहळ्यात आपल्या अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते. यावेळी पुस्तक प्रकाशन सोहळ्यास व्यासपीठावर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध अभिनेते अभिजीत चव्हाण, प्रा. डॉ. प्रदीप ढवळ, प्रकाशक डॉ संतोष राणे, प्रा. प्रज्ञा पंडित, कवयित्री शांता चव्हाण,लेखक कृष्णकुमार काणेकर , लेखक संकल्प अभ्यंकर , मनिष पंडित इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

शारदा प्रकाशनाने यावेळी लेखिका शांता चव्हाण यांच्या “प्रेरणा”, लेखक संकल्प अभ्यंकर यांच्या ‘ कार्तिकनची प्रतिज्ञा, लेखक कृष्णकुमार काणेकर यांच्या ‘ जीवनाच्या लाटांवरून ‘ या पुस्तकांचे त्यांनी प्रकाशन केले. “ मूल्य, नीतिमत्ता, तत्व हरविलेला समाज बदलायचा असेल तर वाचनसंस्कृतीची चळवळ अतिशय निग्रहपूर्वक पुढे न्यावी लागेल. “ असे वक्तव्य कार्यक्रमाचे अध्यक्ष नाटककार आणि नॅशनल एज्युकेशन पॉलिसीचे सदस्य प्रा.डॉ. प्रदीप ढवळ यांनी यावेळी केले.

‘ विद्यार्थ्यांना घडविणारे शिक्षक जेव्हा साहित्य निर्मिती करतात तेव्हा खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळत असल्याचे सांगून लेखिका प्रज्ञा पंडित म्हणाल्या,” शहरात जेवढी ग्रंथालये जास्त असतील तेवढ्या प्रमाणात सामाजिक अभिसरण जास्त होईल.” यावेळी शांता चव्हाण, कृष्णकुमार काणेकर,संकल्प अभ्यंकर यांचीही भाषणे झाली.मनिष पंडित यांनी कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले करून सोहळ्याचा समारोप करताना उपस्थितांचे आभार मानले.

========×======

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
बुधवार २ ऑक्टोबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# मनोज जरांगे पाटील यांचा शिंदे समितीच्या अहवालाबाबत सर्वात मोठा दावा

**मराठा आणि कुणबी एक आहेत हे सिद्ध होऊ द्यायचे नाही, असा अहवाल द्या, असे समितीला कोणी म्हणाले म्हणून असा अहवाल दिला आहे. तुमची इच्छाशक्ती असेल तर मराठ्यांच्या नोंदीसह मराठा हा कुणबी असल्याचे सिद्ध होते असंदेखील मोठं वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी केलं.**

### ‘संस्थानमधील सर्व पुरावे खोटे आहेत का?’

“तुम्ही कशाला दस्तऐवज मानता? ज्या नोंदी देवस्थानकडे, त्या समितीकडे दिल्या, आणि त्या समितीकडे द्यायचे असतात, आणि समिती त्याला कायद्याचा आधार देत असते. समिती त्याला नोंदी असलेला मूळ आधार देत असते. देवस्थानाकडे असलेले पुरावे सर्व समितीने घ्यायचे आणि समितीने ते अधिकृत मानायचे. कारण ते हजारो वर्षांपूर्वीचे आहे. मग ते जर खोटे असेल तर, त्या ठिकाणी अस्तित्वात असलेले संस्थानमधील सर्व खोटे आहे असे तुम्हाला म्हणायचे का?”, असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी केला.



**माजलगाव / प्रतिनिधी**
मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीनंतर राज्य सरकारने निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने आपलं काम पूर्ण करत कामाचा अहवाल सरकारकडे सुपूर्द केला आहे. या समितीला जवळपास दीड लाखांपेक्षा जास्त मराठा कुणबी जुने दस्ताऐवज सापडले आहेत. मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचा अधिकार हा समितीचा नसून राज्य मागासवर्ग आयोगाचा आहे, असं शिंदे समितीच्या अहवालात स्पष्ट करण्यात आलं आहे. या अहवालावर आता मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्यायची राजकीय इच्छाशक्ती असेल तर ती मिळेल, असं मनोज जरांगे पाटील यावेळी म्हणाले. तसेच समितीला मराठा आणि कुणबी एक आहेत हे सिद्ध होऊ द्यायचे नाही असं अहवाल देण्यास सांगितलं असेल, असा मोठा दावा मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी केला. “राज्य मागासवर्ग आयोग पण अस्तित्वात आहे ना? शिंदे समिती, सुक्रे समिती, तीन-चारही न्यायमूर्ती सोबत आहेत. त्याला काय लागतं तर राजकीय इच्छाशक्ती पाहिजे. तुमच्या मनात असेल तर त्याला काही लागत नाही. मराठा आणि कुणबी एकच आहेत, यासाठी तुमच्याकडे 57 लाख नोंदी आहेत, तो आधार घ्यायचा. मागासवर्ग आयोगाकडे द्यायचे असेल तर ती समिती अस्तित्वात आहे, आणि शिंदे समितीकडे द्यायचे ती समिती पण अस्तित्वात आहे, आणि हे एका दिवसात काय, एका घंट्यात होऊ शकते”, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. “तसे पाहिले तर 83 क्रमांकावर मराठा आणि कुणबी एकच आहेत, आणि फक्त शासननिर्णय करण्याची आवश्यकता आहे. एका ओळीचे काम आहे, काशाची गरज नाही ही फक्त बहानेबाजी आहे. पण मराठ्यांशी धोका, दगा फटका झाला तर याचे फळ भोगावे लागणार”, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

### मनोज जरांगे यांचा समितीबाबत मोठा दावा

“तुम्हाला किचकट प्रक्रियेत घुसायचे असेल तर तुम्ही घुसणारच, तुम्हाला काय करायचे, काय नाही करायचे हे तुम्ही ठरवूनच गेले असाल. मग त्याला प्रक्रिया सोपी केली आणि अवघड केली तरी सर्व तुमच्या हातातच आहे. नोंदी शोधणे तुमच्या हातात आहे, आणि त्या द्यायच्या का नाही, हेही तुमच्या हातात आहे. आणि तुम्ही त्या सध्या द्यायच्या बंद केलेल्या आहेत. त्यामुळे समितीने जो अहवाल दिला, तो सरकारच्या म्हणण्याप्रमाणे, आणि मताप्रमाणे दिला असे आम्हाला वाटते”, असा मोठा दावा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. “मराठा आणि कुणबी एक आहेत हे सिद्ध होऊ द्यायचे नाही, असा अहवाल द्या, असे समितीला कोणी म्हणाले म्हणून असा अहवाल दिला आहे. तुमची इच्छाशक्ती असेल तर मराठ्यांच्या नोंदीसह मराठा हा कुणबी असल्याचे सिद्ध होते”, असंदेखील मोठं वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी केलं.

## बीड रेल्वे स्टेशनला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्या
## उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांना निवेदन
## शिव-शाहु-फुले-आंबेडकर अनुयायी युवकांची मागणी

माजलगाव प्रतिनिधी:- दि.०१ माजलगाव येथे जनसन्मान यात्रे निमित्त महाराष्ट्र राज्यचे उपमुख्यमंत्री मा.अजित पवार आले असता शिव-शाहु-फुले-आंबेडकर अनुयायी माजलगाव यांच्या वतीने नव्यानेच तयार होत असलेल्या बीड रेल्वे स्टेशनला अनेक आंबेडकरी अनुयायी चळवळीतील कार्यकर्ते सामाजिक संघटणांनी एकत्र येत बीड रेल्वे स्टेशनला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचे बॅनर लावले होते. परंतु जातीय द्वेषातून पोलीस प्रशासनाकडून तो बोर्ड व निळा झेंडा हटवून विटंबना करण्यात आली आहे ही बाब अत्यंत दुर्दैवी आहे माजलगाव येथील समस्त आंबेडकरी अनुयायांनी यांच्या वतीने मागणी करण्यात येते की, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव बीड रेल्वे स्थानकाला देण्यात यावे तसेच माजलगाव येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचा प्रश्न प्रलंबित आहे तो अद्यापही मार्गी लागलेला नाही हा प्रश्न सर्वांच्या अस्मितेचा प्रश्न आहे तो लवकरात लवकर मार्गी लावण्यात यावा असे निवेदन महाराष्ट्र राज्यचे उपमुख्यमंत्री मा.ना.अजित पवार साहेब यांना देण्यात आले या वेळी उपस्थित ऋषिकेश सोनवणे, विशाल सोनपसारे, अजिंक्य वाघमारे, विलेश कांबळे, गब्बर ससाणे, सुबोध खळगे, रविराज भालेराव, सुजल खळगे, सिध्दांत सातपुते आदी उपस्थित होते.

# आनंदाची बातमी! ऑक्टोबर, नोव्हेंबरचे लाडकी बहीण योजनेचे पैसे या तारखेला मिळणार

सध्या राज्यात ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेचा बोलबाला आहे. तर या योजनेचा तिसरा हप्ता जमा होण्यास सुरूवात झाली आहे. परंतु ऑक्टोबर, नोव्हेंबरचा हप्ता कधी मिळणार याबाबतची महत्त्वपूर्ण माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार (Ajit Pawar) यांनी दिली आहे.सध्या राज्यात ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेचा बोलबाला आहे. या योजनेसाठी एक कोटींहून अधिक अर्ज स्वीकारण्यात आले आहेत. तसंच योजनेचे दोन हप्ते महिलांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. आता ऑक्टोबर, नोव्हेंबरच्या हप्त्याची प्रतीक्षा संपली आहे. जनसन्मान यात्रेत केली घोषणा : समाजातील सर्व समाज घटकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी महायुतीचे हे सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री




अजित पवार (Ajit Pawar) यांनी परळीत दिली. त्याचप्रमाणे ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने’चे ऑक्टोबर आणि नोव्हेंबरचे पैसे बहिणींच्या खात्यात 10 ऑक्टोबरपर्यंत देणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणाही त्यांनी जनसन्मान यात्रेत केली.

## हा ट्रेलर आहे, यापुढे पिक्चर दाखवू, मराठा समन्वयकाचा हाकेंना इशारा

पुण्यात बिअर पिवून ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाकेंनी धमक्या दिल्याचा आरोप मराठा कार्यकर्त्यांनी केला. त्यानंतर हाकेंना पोलिसांच्या ताब्यातही दिलं आणि आता हाकेंनी थेट छत्रपती संभाजीराजेंवरच आरोप केला. संभाजी भोसलेंनी माझ्या अंगावर मारेकरी घातले असं हाकेंचं म्हणणंय. तर हा ट्रेलर आहे, यापुढे पिक्चर दाखवू असा इशारा मराठा समन्वयक गंगाधर पाटलांनी दिला. कोंढव्याच्या टिळेनगर



परिसरात हाके सार्वजनिकस्थळी बिअर पित होते असा आरोप मराठा कार्यकर्त्यांनी केला. छत्रपती संभाजीराजेंनाबद्दल अपशब्द का वापरला याचा जाब विचारला असताना शिवीगाळ आणि धमकी दिल्याचा आरोप मराठा कार्यकर्त्यांचा आहे.



ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारला आरक्षणाच्या मुद्द्यांनी घेरलेलं असतानाच भाजपने मात्र आक्रमक हिंदुत्वाचा मुद्दा लावून धरला आहे. त्यातही भाजपचे नेते नितेश राणे यांनी हिंदुत्वाच्या मुद्द्याला अधिक हात घातला आहे. नितेश राणे हे ज्या ज्या हिंदुत्ववादी संघटना आहेत, त्यांच्या मंचावर जाऊन अत्यंत आक्रमक भाषणं करत आहेत. त्यांचं भाषण ऐकण्यासाठी प्रचंड गर्दी होत आहे. त्यामुळे नितेश राणे हे भाजपमधील आक्रमक हिंदुत्ववादी चेहरा म्हणून समोर येत असल्याचं स्पष्ट होत आहे. नितेश राणे यांच्या या आक्रमक हिंदुत्वावर अजितदादा गटाकडून आक्षेप घेतला जात असला तरी भाजपने मात्र राणे यांची पाठ राखणच केली आहे. त्यामुळे राणे यांच्या माध्यमातून हिंदू मत एकवटण्याची भाजपची ही खेळी तर नाही ना? अशी चर्चा या निमित्ताने सुरू झाली आहे.




# विधानसभा निवडणुकीत मराठा आरक्षणाचा मुद्दा गाजणार, शिंदे समितीचा अहवाल मान्य

**दैनिक लोकआरंभ//**
मराठा आरक्षणासंदर्भात निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदेंच्या समितीनं जो अहवाल सरकारला दिला. तो कॅबिनेटच्या बैठकीत मान्य झाला. ज्यात 3 प्रमुख बाबी आहेत. शिंदे समितीचं म्हणणं आहे की, सर्व कुणबी मराठा आहेत किंवा सर्व मराठा कुणबी आहेत, असा कोणताही निष्कर्ष काढण्याची कार्यकक्षा समितीची नाही, हे मागासवर्ग आयोगानं ठरवावं. म्हणजेच सोप्या भाषेत सांगायचं झालं तर, सर्व कुणबी मराठा आहेत हे समिती ठरवूच शकत नाही दुसरा मुद्दा आहे, निझाम राजवटीतील 1881च्या वैयक्तिक नोंदी आढळल्या नाहीत. पण जातीचा उल्लेख आहे. म्हणजेच नावानिशी नोंदी नाहीत, पण जातीच्या नोंदी निझामकालीन दस्तऐवजांमध्ये आहेत. त्यामुळं निझाम कालीन दस्तेऐवजांमध्ये काय आहे, हे आता स्पष्ट झालं या नोंदी शोधल्यास मराठवाड्यातील रहिवाशांना कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी मागास असल्याचा दावा मोठ्या प्रमाणात करता येईल असं समितीचं म्हणणं आहे तिसरा मुद्दा आहे, त्र्यंबकेश्वर देवस्थानाकडे जातीचे तपशील असलेल्या वंशावळी आहेत पण हा पुरावा व्यक्तीश: सादर केला जावू शकतो. तो तपशील सार्वजनिक दस्तऐवजांचं वैशिष्ट्य ठरु शकतो असं आम्ही मानत नाही हे समितीचं म्हणणंय. तर सरकारच्या सांगण्यानुसारच शिंदे समितीनं अहवाल दिल्याचा आरोप, जरांगेंनी केला आहे. त्र्यंबकेश्वरच्या देवस्थानाकडील जातीच्या वंशावळीचा आधार पुरावा म्हणून घेतला जावू शकतो, असं समितीचं म्हणणंय... पण त्याचवेळी समितीनं हेही म्हटलंय की, त्या वंशावळी सार्वजनिक दस्तऐवजाचं वैशिष्ट्य ठरत नाही...आता त्यावरुन जरांगे आणि हाके दोघांनीही सरकारलाच सवाल केलेत. जरांगे पाटलांची मागणी आहे की, सर्व मराठा समाजाला कुणबी अर्थात ओबीसीतून आरक्षण द्या आणि आचारसंहिता घोषित होण्याआधी जर मागणी मान्य झाली नाही तर, मराठे विजयाचा टिळा लागू देणार नाही, असा इशाराच फडणवीसांना दिला आहे. शिंदे समितीनं एक बाब क्लीअर केली की, मराठा आणि ओबीसी असं वर्गीकरण करण्याचे अधिकार त्यांच्याकडे नाहीत... तो अधिकार मागासवर्ग आयोगाकडेच आहे. त्यामुळं मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष मंत्री चंद्रकांत पाटीलही म्हणताय की सर्व मराठ्यांना कुणबी अर्थात ओबीसीतून जातप्रमाणपत्र देणं कायदेशीरदृष्ट्या कठीण आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com